# प्रकरण पहिले

# कोल्हापूर जिल्हयातील सहकारी दूध संस्थांचा विकास

# प्रकरण १ ले

# कोल्हापूर जिल्हयातील सहकारी दूध संस्थांचा विकास

**प्रस्तावना :**

प्रस्तुत प्रकरणात कोल्हापूर जिल्हयातील सहकारी दूध संस्थांच्या विकासाचा थोडक्यात आढावा घेतला आहे. या प्रकरणात दोन विभाग आहेत. पहिल्या विभागात कोल्हापूर जिल्हयात सहकारी तत्वावर कार्यरत असणाऱ्या दूध संघांचा थोडक्यात परिचय करून दिला आहे. दूसऱ्या विभागात प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या दोन महिला सहकारी संस्थांचा थोडक्यात परिचय करून दिला आहे.

## विभाग पहिला : कोल्हापूर जिल्हयातील सहकारी दूध संस्थांचा विकास : थोडक्यात आढावा.

पुर्वीच्या काळी जनावरे हा शेतीचा मुख्य आधार समजला जात असे. शेतकऱ्यांकडे असलेल्या जातीवंत जनावरांची संख्या व त्यांची गुणवत्ता यावरून त्या शेतकऱ्यांची समाजातील प्रतिष्ठा व ऐपत अवलंबून असावयाची. त्याचे महत्वाचे कारण असे की , त्या काळी शेतीची जवळ जवळ सर्व कामे जनावरे करीत. शेतीच्या कामास उपयोगी जनावरांच्या पैदाशीसाठी गायी व म्हैशीही मोठया प्रमाणात सांभाळल्या जात. साहजिकच शेती उपयोगी जनावरांच्या पैदाशीबरोबर शेतकऱ्यांच्या कुटूंबास लागणारे दूघ दूभते मुबलक प्रमाणात उपलब्ध होत असे.

पुर्वीच्या काळी दुधाची विक्री फारशी होत नसे. त्याऐवजी दुधापासून दही व दहयापासून काढलेले लोणी जवळच्या बाजारात विक्रीसाठी नेले जाई. दही, ताक यासारखे दुधाचे पदार्थ एकमेंकांना मोफत दिले जात. असे दुधाचे व्यवहार मापी शेरात होत असत.

कोल्हापूर शहरात शाहू महारांजांच्या काळात दूभती जनावरे पाळणारी काही कुटूंबे होती. त्यांना 'गवळी' म्हणत. आजही अशी बरीच कुटूंबे आहेत. यातील वैशिष्ठयपूर्ण बाब म्हणजे हे गवळी लोक आपआपली दुभती जनावरे शहराच्या विशिष्ठ ठिकाणी आणून तेथे समक्ष दूध काढून नैसर्गिक धारोष्ण दूध गिऱ्हाईकांना पुरवित असत, तर काही हैशी लोक असे धारोष्ण दूध जागेवरच पीत असत. यात मोठया प्रमाणावर पैलवान लोकांचा भरणा असे. आजही ही पध्दत शहरात काही ठिकाणी चालू आहे. कोल्हापूरात गंगावेश दुधकट्टा हा अत्यंत प्रसिध्द आहे.

जवळपासच्या लहान मोठया शहरातून औद्योगिकरण सुरू झाल्यावर उद्योग, नोकऱ्यांकरिता ग्रामीण भागातून लोक शहराकडे येऊ लागले. तेथील लोकसंख्येत वाढ झाली. अशा शहरातून दूध मागणी सुरू झाल्याने जवळपासच्या खेडयातून शेतकऱ्यांच्या बायाबापडया डोकीवर दूध, दहयाच्या पाटया घेऊन पायी चालत शहरात येऊन गल्लोगल्ली 'दूध घ्या', 'दही घ्या' असे ओरडून सांगून दूध दुभते विक्री करीत. दूध विक्रीतून मिळणाऱ्या पैशातून त्यांच्या संसारातील किरकोळ बाबींना हातभार लागत असे. अशा तऱ्हेने दूध विक्री सुरू झाली. यानंतर शहरे व नगरांच्या लोकसंख्येत जसजशी वाढ होऊ लागली तसतशी दूधाची मागणी वाढू लागली. त्यामुळे दूधपूरवठा धंदा सुरू होऊन तो वाढत गेला.

औद्योगिकरणामुळे शहरी लोकसंख्या वाढतच राहिली. विशेषतः स्वातंत्र्यानंतर लोकसंख्या वाढीस वेग येत गेला. त्यामुळे या भागात बाटली बंद दूधाची मागणी सुरू झाली व दूध पुरवठा हा दुग्धव्यवसाय म्हणून मान्यता पावू लागला. तसेच शेतीकामामध्येही आधुनिकिकरण, यांत्रिकीकरण होऊ लागले. शेती जनावरांचे महत्व थोडे कमी होऊन, दूधाळ जातीच्या जनावरांच्या वाढीकडे जास्त प्रयत्न सुरू झाले व दुग्ध व्यवसाय हा शेतीस मुख्य धंदा होण्याच्या दृष्टीने व शेतक-यांच्या आर्थिक स्थितीत भर टाकणारा जोड धंदा म्हणून या धंद्याकडे शेतकऱ्यांचे लक्ष वेधले गेले.[१]

भारतात सहकारी चळवळीची सुरूवात १९०४ साली झाली. त्यानंतर १९१३ साली पहिली दुध डेअरी अलाहाबाद उत्तरप्रदेश इथे स्थापन झाली तीच कत्रा सहकारी दूध डेअरी म्हणून ओळखली गेली. या नंतर देशामध्ये बडोदा, बेळगांव, धुलिया, भागलपूर, बागलकोट, हुबळी , कलकत्ता अशा अनेक ठिकाणी दूध संघांची स्थापना झाली.

सुरवातीला दूध संघांची दूध जमा व विक्रीची क्षमता मर्यादित होती. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या व्यवसायामध्ये प्रगती होत राहिली. इ. स. १९४६ साली गुजरातमधील कैरा जिल्हयातील आनंद शहरात अमूल दूध संघांची स्थापना झाली तिथे जमा झालेले दूध व राहिलेल्या दूधापासूनचे प्रक्रिया केलेले दुग्धजन्य पदार्थ मुंबई व इतर शहरातून पाठविले जाऊ लागले. गवळी लोकांकडून विक्री होणाऱ्या दुधापेक्षा पाश्चराईज केलेले दूध मुबलक प्रमाणात शहरी लोकांना मिळाल्यामुळे दूध संघाकडे मागणी व पुरवठा वाढत राहिला. त्यामुळे खेडयातील दूध शहरात येऊ लागले व शहरातील पैसा खेडयातील दूध पुरवठादारांना मिळू लागला यातूनच ग्रामीण भागातील लोकांना शेती व्यवसायबरोबरच पशुपालन व्यवसायाचे महत्व पटू लागले. त्यामुळेच आज दुग्धव्यवसाय शेतीला पूरक व्यवसाय म्हणून भरभराटीला येत आहे.

दुग्ध व्यवसायातील मागणी व पुरवठा लक्षात घेऊन भारत, सरकारने इ. स. १९६५ साली 'नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्ड' (N. D. D.B.) स्थापन करून शेतीव्यवसायातील 'हरितक्रांती' प्रमाणे 'धवलक्रांती' म्हणजेच 'दुध महापुर' योजना (Operational Flood) गुजरातमधील आनंद पॅटर्न प्रमाणे देशात इतरत्रही लागू केली आणि याचाच परिणाम म्हणून आज आपला भारत देश दूध उत्पादनाच्या बाबतीत जगातील एक मोठा दूध उत्पादक देश ठरला आहे.

इ. स. १९७० साली दुग्धव्यवसाय विकास कार्यक्रमाचे अंतर्गत 'दूध महापूर' योजना राज्यपातळी व जिल्हा पातळीवरही राबविली गेली. ही योजना राष्ट्रीय दुग्ध विकास निगम आनंद मार्फत लागू करयात आली. या दूध महापूर योजनेमुळे सहकारी क्षेत्रातील

दूग्धोत्पादन व्यवसायाला फार मोठी चालना मिळाली. अति दूर्गम ग्रामीण भागापासून थेट देशपातळीपर्यंत सहकारी दूध संस्थाचे जाळे निर्माण झाले. त्यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्याला त्याच्या दुधाची विक्री करण्याची कायमची सोय दूधसंस्थांमूळे शेतकऱ्याला उपलब्ध झाली याचा परिणाम म्हणून फॅट आणि एस. एन.एफ. या दोन ध्रुवांवर आधारित दर मिळत असल्या कारणाने उत्तम प्रतिच्या दुधाला अधिक दर मिळू लागला आहे.

आनंद पॅटर्नची दूध महापूर योजना महाराष्ट्र राज्यात १९७० च्या आसपास सुरूवात झाली. गेल्या २५ वर्षापूर्वी महाराष्ट्रात दरवर्षी १० लाख टन लिटर दूध निर्माण होत होते. १९९७–१९९८ साली ते ३८ लाख टन लिटरवर पोहोचले आहे. पुणे विभागात १९९७–९८ साली ९.७१ लाख लिटर दूध प्रत्येक दिवशी निर्माण होत होते. तर त्या पाठोपाठ कोल्हापूर विभागात ८.५ लाख लिटर दूध दर दिवशी निर्माण होत होते तर १ एप्रिल २००२ ते ३१ मार्च २००३ साली एकटया गोकूळ दूध संघाचे सरासरी दैनिक दूध संकलन ५ लाख २१ हजार ३३९ लिटर इतके दूध संकलन झाले आहे. कोल्हापूर जिल्हयातील एकटया गोकूळ दूध संघाची दूधाची वार्षिक उलाढाल ४०० कोटी रूपयांच्या आसपास केली जाते.

दुग्ध व्यवसायाच्या विकासाच्या संदर्भातील महाराष्ट्र शासनाच्या सर्वंकष व जाणिवपूर्वक प्रयत्नांमुळे आणि राज्यातील सहकारी संस्थांनी त्या प्रयत्नांना दिलेल्या मनमोकळया प्रतिसादांमुळे आज महाराष्ट्रातील दुग्ध उत्पादनात लक्षणीय वाढ झालेली आहे. भारतातील कोणत्याही अन्य राज्यांपेक्षा मोठया प्रमाणात सहकारी चळवळीचा अवलंब महाराष्ट्रात करण्यात आला आहे. आजपर्यंत ग्रामपातळीवरील प्राथमिक सहकारी दूध उत्पादक संस्था, तालुका, जिल्हा दूध संघ, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध उत्पादक संघ अशी त्रिस्तरीय सहकारी यंत्रणा कार्यरत आहे. महाराष्ट्रात तालुका व जिल्हा दूध संघाची संख्या जवळ जवळ ८० चे आसपास व दूध संस्थाची संख्या १९९७ मध्ये जवळ जवळ २०,०८४ होती.

महाराष्ट्रातील दुग्धविकास कार्याचे हे सर्वसाधारण चित्र असले तरी प्रत्यक्षात कोल्हापूर जिल्हा व जिल्हयातील सहकारी दूध व्यवसाय हाच आज राज्यात प्रथम क्रमांकावर आहे.

एकटया कोल्हापूर जिल्हयात दि. ३१.०३.२००३ रोजी नोंदणीकृत अशा ३१२५ सहकारी दुधसंस्था आहेत. त्यापैकी केवळ महिलांच्या सहकारी दूध संस्थाची संख्या ५४९ इतकी आहे. दि. ३१.०३.२००३ रोजी चंदगड तालुक्यात २७७ सहकारी संस्था गावपातळीवर दूध संकलनाचे काम करीत आहेत. त्यामध्ये केवळ महिलांच्या सहकारी संस्थांची संख्या ३५ आहे.

दिंनांक ३१.०३.२००२ ते ३१.०३.२००३ अखेर कोल्हापूर जिल्हयातील नोंदणीकृत असलेल्या सहकारी दूध संस्थाचा तालुकावार तक्ता खालील प्रमाणे आहे.

## सारणी क्रमांक १.१

### दुग्ध व्यवसाय संस्था वाढ /घट तक्ता ३१.०३.२००२ ते ३१.०३.२००३

| अ. क्र | तालुका | दि ३१.०३.०२ मधील संख्या | दि ३१.०३.०३ मधील वाढ | दि ३१.०३.०३ अखेर संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | आजरा | १७९ | १३ | १९२ |
| २ | भूदरगड | २३४ | २८ | २६२ |
| ३ | चंदगड | २५८ | १९ | २७७ |
| ४ | गडहिंग्लज | २१६ | २१ | २३७ |
| ५ | गगनबावडा | ३८ | ०८ | ०४६ |
| ६ | हातकणंगले | १९७ | १७ | २१४ |
| ७ | कागल | २८६ | २० | ३०६ |
| ८ | करवीर | ४१३ | ३४ | ४४७ |
| ९ | पन्हाळा | ३१६ | ३९ | ३५५ |
| १० | राधानगरी | ३३० | ३९ | ३६९ |
| ११ | शाहूवाडी | २०३ | ३९ | २३० |
| १२ | शिरोळ | १७७ | १३ | १९० |
| | एकूण | २८४७ | २७८ | ३१२५ |

आधार : सहाय्यक निबंधक (दुग्ध) जिल्हा दूध संघ आवार, कोल्हापूर

वरील सारणीवरून दिनांक ३१.०३.२००३ अखेर नोंदणीकृत सहकारी दूध संस्थाची तालुकावार माहिती आपल्याला दिसून येते. यावरून कोल्हापूर जिल्हयातील सहकारी दूध संस्थाची दिनांक ३१.०३.२००३ अखेर एकूण संख्या ३१२५ असल्याचे निदर्शनास येते. यापैकी एकूण महिला दूध संस्थाची संख्या दिनांक ३१.०३.२००३ अखेर ५४९ आहे. त्यापैकी

चंदगड तालुक्यात २७७ सहकारी दूध संस्था आहेत त्यापैकी ३५ महिला सहकारी दूध संस्था दूध संकलनाचे काम करीत आहेत.

यावरून असे म्हणता येते की खऱ्या अर्थाने कोल्हापूर जिल्हयात 'धवलक्रांती' घडून आली आहे. ती घडवण्यात कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघांची महत्वाची भूमिका आहे. कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघातर्फे आज कोल्हापूर जिल्हयाच्या शेकडो गावातून रोज साडेपाच लाखापेक्षा अधिक दुधाचे संकलन केले जाते व पाश्चराईज करून त्याची मुंबई व इतर शहरात गिऱ्हाईकाना थेट विक्री केली जाते. याचाच अर्थ रोज लाखो रूपयांपेक्षा अधिक पैसा शेकडो खेडयातील दूध उत्पादक, गरीब, मध्यम शेतकरी, शेतमजूर कुटूंबाकडे येत आहे. आज या हजारो कुटूंबाना दूधाच्या माध्यमातून होणारे उत्पन्न त्या कुटूंबाच्या दैनंदिन गरजा भागविणारे एक साधन बनले आहे आणि त्याचवेळी या दुग्ध व्यवसायाने ग्रामीण समाजात एक अभूतपूर्व सामाजिक आर्थिक परिवर्तन घडविलेले आहे. प्रत्येक ग्रामीण कुटूंबात, कुटूंबातील महिला गायी, म्हैशींची देखभाल करणे, धार काढणे, व गावच्या दूध संकलन संस्थेत दूध नेऊन घालणे हे काम करीत असतात. यापैकी बऱ्याच महिला या स्वतःच त्या दूध संस्थातून संचालिका व सभासद आहेत. ४,५(६)

## कोल्हापूर जिल्हयातील सहकारी दूध संस्थाचा विकास : परिचय

कोल्हापूर जिल्हयातील आजच्या या धवलक्रांतीची सुरूवात कशी झाली ?

दिनांक ३०.१०.१९६१ मध्ये करवीर तालुक्यातील काही व्यक्तिगत शेतकरी, गवळी व काही शेतकरी सेवा संस्था यांनी एकत्र येऊन करवीर तालुका शेतकरी संघाची स्थापना केली व त्यांच्यामार्फत दूध संकलनाचे काम सुरू केले.

सन १९६२ मध्ये स्व. ना. पी. के. सावंत हे शेतीमंत्री असताना कोल्हापूर जिल्हयाला पथदर्शक दूध योजना लागू करण्यात आली व यथाक्रम कोल्हापूर येथे शासकीय दूध डेअरीची स्थापना केली गेली.

पुढे १६.०३.१९६३ रोजी नव्या मिल्क फेडरेशनची स्थापना करण्यात आली. श्री आनंदराव पाटील चुयेकर व इतर दहाजण फेडरेशनचे संस्थापक प्रवर्तक होते व श्री एन. टी. सरनाईक हे मुख्य प्रवर्तक होते. फेडरेशनमध्ये २२ सेवा संस्था व ४० व्यक्तींचा सहभाग होता. विशेष म्हणजे तेंव्हा संस्थेकडे आज डेअरी व्यवसायात वापरल्या जाणाऱ्या कोणत्याही साधन सामग्री सोयींचा अभाव होता. घागंरीमधून जमा केलेले दूध कढयांमध्ये तापवून थंड करून नंतर दुधाच्या कॅनमध्ये ठेवत असत व दूध थंड रहावे म्हणून बर्फाचा वापर करीत असत.

सन १९६२ मध्ये स्थापन झालेल्या शासकीय दूध योजनेच्या अद्ययावत सरकारी डेअरीत १९६३ , १९६४ व ६५ अशी तीन वर्षे मिल्क फेडरेशन शासकीय डेअरीला दूध पुरवत होते. मुंबईच्या वरळी डेअरीलाही ७०० लिटर दूध पूरवले जाई.

तथापी फेडरेशन लागोपाठ तोटयात येत राहिले दूध उत्पादक व पुरवठादारांची बिले भागवणेही अशक्य झाले अखेरीस सन १९६९-७० मध्ये करवीर तालुका मिल्क फेडरेशनचे कार्य बंद पडले व त्याचे अध्यक्ष एन. टी. सरनाईक यांनी राजीनामा दिला.

त्यानंतर सन १९७१ मध्ये आनंदरावांची फेडरेशनचे अध्यक्ष म्हणून निवड झाली तेव्हापासून ते पुढे दि ०५.११.१९७३ ला झालेल्या कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघाच्या स्थापनेपर्यंत ते थेट १९९० पर्यंत आनंदराव पाटील चुयेकर हेच संघाचे अध्यक्ष राहीले.

फेडरेशनच्या कामास नव्याने प्रारंभ झाला. याच वेळी फेडरेशनच्या दूध संकलन व विक्री कार्यासाठी कोल्हापूरातील लिबर्टी टॉकीजच्या जवळ भाडयाने जागा घेतली, फेडरेशनकडून १९७० मध्ये कोल्हापूर शहरात बाटल्याने दूध पुरवठयास सुरवात झाली

तेव्हा दुध उत्पादकांची संख्या १२०४ होती व दुधाच्या विक्रीचा भाव दर लिटरला १.५० पैसे होता तरीसुध्दा १९७१ मध्ये ७६ दूध डेअरी संस्था होत्या व फेडरेशनचे शेअर भांडवल रू ३२,०००/- होते. लिटरला रू १.२० पैसे भावाने दूध खरीदले जाई.

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध संघांची स्थापना झाली तेव्हा दूधाचा दर एका लिटरला २ रू होता. बारा तालुक्यांचा या जिल्हा संघात समावेश होता. महाराष्ट्र शासनाच्या नव्या धोरणानुसार यानंतरच्या काळात प्रत्येक गावात प्राथमिक सहकारी दूध संस्थेची स्थापना झाली. त्याचवेळी एका जिल्हयात एकच जिल्हा दूध संघ हे शासनाचे धोरण ठरले. राष्ट्रीय डेअरी विकास महामंडळाने हे धोरण ठरवले होते. यवेळी श्री शंकरराव बाजीराव पाटील हे राज्याचे दुग्धविकास मंत्री होते.

सन १९७५-१९७६ या काळात श्री आनंदराव पाटील चुयेकर यांनी सहकाऱ्यांच्या मदतीने कोल्हापूर जिल्हयाचे दूध उत्पादन वाढीच्या संदर्भात सर्वेक्षण केले. याच सुमारास नियोजन मंडळ व राष्ट्रीय दूध डेअरी विकास महामंडळाच्या तर्फे (एन.डी.डी.बी.) कोल्हापूर जिल्हयाला 'दूधाचा महापूर' ही योजना महाराष्ट्र शासनाच्या हमीवर लागू करण्यात आली.

यानंतर कोल्हापूर जिल्हयातील दूध उत्पादनात मोठया वेगाने वाढ होत राहिली एकेकाळी दूध उत्पादकाला महिन्याच्या अखेरीस त्यांच्या दुधाचे पैसे दिले जात. उत्पादकांच्या दृष्टीने ही गोष्ट आर्थिक अडचणीची होती. तेंव्हा दूध उत्पादकाला दर पंधरा दिवसांनी त्यांने त्या पंधरवडयात घातलेल्या दूधाचे पैसे देण्याची व्यवस्था करण्यात आली.

या सर्व बाबीचा परिणाम असाा झाला की सन १९७६-७७ मध्ये जिल्हा दूध संघाचे संकलन रोज १ लाख लिटर होऊ लागले. तथापि कोल्हापूरच्या शासकीय दूध डेअरीची पाश्चरायझेशनची क्षमता ८० हजार लिटर होती त्यामुळे जादा २० हजार लिटर दुधाचे

वक्र्य करायचे अशी समस्या निर्माण झाली व त्यामुळे आठवडयातून एक दिवस दूध संकलनाचे काम थांबवावे लागे व ही गोष्ट दूध उत्पादकांच्या दृष्टीने तोटयाची होती.

सन १९७७ मध्ये राष्ट्रीय दूध डेअरी विकास मंडळाचे प्रमुख डॉ. कुरीयन, महाराष्ट्र राज्याचे दुग्धविकास खात्याचे संचालक श्री पद्मनाभय्या व श्री आनंदराव पाटील चुयेकर यांची गुजरातमधील आनंद येथे बैठक झाली त्यामध्ये कोल्हापूरची शासकीय दूध डेअरी कोल्हापूर जिल्हा दूध संघाच्या ताब्यात द्यावी अशी मागणी मांडली. त्याला विरोध झाला पण अखेरीस त्या बैठकीत विचारविनिमय होऊन जिल्हा दूध संघाला स्वतःची वेगळी दूध डेअरी उभारण्यास परवानगी देण्याचे मान्य केले. मात्र अशी अट घातली की दुध संकलन विक्रीची सर्व जबाबदारी जिल्हा दूध संघाने घ्यावी.

त्यानंतर जिल्हा दूध संघाने मुबईत दुधाची विक्री करण्यास संघाला परवानगी द्यावी अशी मागणी तात्कालिन मुख्यमंत्री मा. वसंतदादा पाटील व नंतर मा. शरद पवार यांच्याकडे केली.

कोल्हापूरची शासकीय दूध डेअरी जिल्हा दूध संघाच्या ताब्यात मिळावी अशी मागणी होती. पण प्रत्यक्षात दि. ३०.०४. १९८५ रोजी मिळाली. ही डेअरी जिल्हा संघाच्या ताब्यात देण्यास डेअरीच्या प्रशासकीय कर्मचा-यांनी वारंवार विरोध केल्याने हस्तांतरांचा प्रश्न रेंगाळत राहिला पण प्रत्यक्षत १९८५ सालच्या हस्तांतराने शासकीय दुध डेअरी जी प्रतिवर्षी १ कोटी रूपये तोटा सहन करीत होती ती डेअरी जिल्हा संघाच्या ताब्यात गेल्यामुळे सरकारचा करोडो रूपयांचा तोटा वाचला अशा प्रकारे कोल्हापूरची शासकीय दूध डेअरी कोल्हापूर जिल्हा दूध संघात हस्तांतरीत झाली

## १. कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ :

या संघाची स्थापना १६ मार्च १९६३ रोजी झाली आरंभीच्या काळात या संघाला केवळ दैनिक ६०० ते ७०० लिटर एवढेच दूध संकलन करावे लागत होते. घरातील दूध

विकून जर पैसा मिळविला तर जनावरांची कास जळते व दूध बंद होते अशी अंधश्रध्दा दूध उत्पादकांच्या मनात रूजलेली होती. महाराष्ट्र शासनाच्या प्रयत्नाने गावो गावी दूध संस्था स्थापन करण्यासाठी शासकीय अधिकारी व दूध संघाचे पदाधिकारी यांना सभा घ्याव्या लागत कोल्हापूर जिल्हा दूध संघाचे कार्यक्षेत्र प्रारंभी शिरोळ व पन्हाळा तालुका सोडून होते. सध्या कार्यक्षेत्र संपूर्ण जिल्हयासाठी करण्यात आले आहे. कोल्हापूर जिल्हयाचे दुग्ध उद्योगाचे वैशिष्ठ म्हणजे जिल्हयांत दोन स्वतंत्र यंत्रणेमार्फत दूध गोळा केले जात होते. त्या दोन यंत्रणा म्हणजे 'शासकीय दुग्ध योजना' आणि 'जिल्हा सहकारी दूध संघ', दूध संघाचे कार्य व शासकीय योजनेचा तोटा लक्षात घेऊन शासनाने शासकिय दुग्ध योजना दूध संघांकडे सन १९८५ मध्ये हस्तांतरीत केली. तेव्हांपासून कोल्हापूर जिल्हयातील सहकारी दुग्ध व्यवसायाला चालना मिळाली.

जिल्हयात दुध महापूर योजना १९७८ पासून लागू झाली होती. राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ (आनंद) (एन.डी.डी.बी.) या साठी कर्जे व अनुदानही देत होते. दररोज दुधाची दोन वेळा तपासणी करून त्या दुधाला त्यातील स्निग्धांशा (फॅट) प्रमाणे किंमत दिली जाऊ लागली. त्यामुळ सभासदांच्या दुधाला दर्जाप्रमाणे दर मिळू लागला. प्रामाणिक दुग्ध उत्पादकाला नेमकी याचीच गरज होती. त्यामुळे कोल्हापूर जिल्हा अल्पावधितच दूध महापूर योजनेत राज्यात आघाडीवर आला.

कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघ आणि त्याला संलग्न झालेल्या गावच्या दुग्ध संस्था व राज्यपातळीवरील दूध महासंघ ( महानंदा ) अशी त्रिस्तरीय पध्दती आता दुग्ध व्यवसायात चांगलीच रूळली आहे. कोल्हापूर जिल्हयाला दूध महापूर योजनेमुळे खूपच फायदे मिळाले आहेत. १९७८ ते १९९५ पर्यंत दूध महापूर योजना अंमलात होती आता ही योजना बंद झालेली असून देशातील ज्या त्या संघाने आपल्या स्वबळावर योजना राबवावयाची आहे.

१९८४ मध्ये जिल्हा दूध संघाने गोकूळ शिरगांव येथे जागा घेऊन उत्पादनास प्रारंभ केला. एकेकाळी तोटयात चालेला दूध संघ आज लाखो रूपयांच्या फायद्यात तर आहेच शिवाय दैनंदिन दोन लाख लिटर दूध संकलनावरून जवळ जवळ सहा लाख लिटर दूध संकलनापर्यंत मजल मारली आहे. दिनांक १.०४.२००२ ते दिनांक ३१.०३.२००३ रोजी गोकूळ दूध संघाचे १९,०२,८८,९१२ लिटर वार्षिक दूध संकलन झालेले आहे. दररोज अंदाजे ५० लाख रूपये ग्रामीण दूध उत्पादकांना संघाकडून प्राप्त होत आहेत.

कोल्हापूर जिल्हयात आज साखर उद्योगापेक्षा दुग्ध व्यवसाय भरीव आर्थिक विकास करीत आहे. दुग्ध सहकार प्रगती पथावर राहिला आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे कोल्हापूर जिल्हयाचे हवामान, शेतकऱ्यांची चिकाटी, आनंद पध्दतीचा स्वीकार, दुग्ध उत्पादनासाठी लागणारी आव्हाने आणि कार्यकर्त्यांची ध्येय धोरणे होय. सहकारी तत्वावर चालविलेल्या दूध संघाने सध्याच्या खाजगीकरणाच्या काळातही मुंबई, पुणे, गोवा, बेंगलोर, येथपर्यंतच्या बाजारपेठेत बाजी मारली आहे. ही बाब सहकारी कार्यकर्त्यांना निश्चितच अभिमानाची आहे.[३] ४

दि ४ जून २००३ च्या दैनिक पुढारी मध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीनुसार कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध संघ (गोकूळ) आणि राष्ट्रीय दुग्ध विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने राधानगरी व भूदरगड तालुक्यात येत्या वर्षभरात महिला नेतृत्व विकास कार्यकम राबविणार असल्याची माहिती गोकूळ दूध संघाकडून प्रसिध्द झाली.

गोकूळने यापूर्वी गोकूळ ग्राम योजना सुरू करून ग्रामीण विकासात मोलाचा वाटा उचलला आहे. ग्रामीण भागातील महिलांचे सबलीकरण आणि आर्थिक उन्नती हे दोन निकष ठेवून महिला नेतृत्व विकास कार्यकम राबवला जाणार आहे. ही योजना राधानगरी व भुदरगड तालुक्यातील काही गावात राबवली जाणार आहे. या अंतर्गत महिलांसाठी शैक्षणिक कार्यक्रेम मुलीचे व्यक्तिमत्व विकास कार्यक्रम, ग्राम स्वच्छता व सफाई स्पर्धा, सांस्कृतिक स्पर्धा, नेतृत्व व आरोग्यविषयक कार्यक्रम, महिला बचतगटांची स्थापना,

कायदेविषयक सल्ला व सहाय्य शिबिर आदि कार्यक्रम राबवले जाणार आहेत. दूध संस्थेच्या संचालक मंडळासाठी व कर्मचाऱ्यांसाठी प्रेरणा कार्यक्रम व दूध संस्थाचा वार्षिक कृती आराखडा कार्यक्रम राबविला जाणार असून या कार्यक्रमाद्वारे दुधसंस्थासह दूध उत्पादक व महिलांना सबल केले जाणार असे वृत्त प्रसिध्द झाले आहे.[४] ५(६)

## २. वारणा सहकारी दूध उत्पादक संघ :

तात्यासाहेब कोरे यांनी पन्हाळा तालुक्यातील परिसरात १९६८ मध्ये वारणा सहकारी दूध उत्पादन प्रक्रिया संघ स्थापन केला. प्रारंभी केवळ ८१२ दूध उत्पादक आणि दोन संस्था यांच्या सहकार्याने लावलेले इवलेसे रोपटे आज विशाल वटवृक्षात रूपांतरित झाले आहे. सध्या या संघात १५,४४४ दूध उत्पादक आणि १५० पेक्षा जास्त दूध संस्था कार्यरत झाल्या आहेत. सन २००१ साली २,२४,५३३ लिटर्स दैनंदिन दूध संकलन आहे. तर १६० कोटी रूपयांपेक्षा अधिक दरवर्षी वारणा दूध संघाची उलाढाल होत आहे. दररोज पाच टनापेक्षा अधिक दूध भूकटी तयार होत आहे. या संघाचे वारणा ब्रँड धारण केलेले दूध, तूप, भूकटी, श्रीखंड, लस्सी या सारखे पदार्थ देशाच्या प्रमुख शहरात विकले जात आहेत. संघाने मुंबई येथे वाशी औद्योगिक परिसरात स्वतःचा प्रक्रिया उद्योग चालू केला आहे. वारणा दूध संघामुळे या परिसरात दररोज ढोबळमानाने दहा लाख रूपयांपेक्षा अधिक रक्कम ग्रामीण दूध उत्पादकांना प्राप्त होत आहे.

वारणा दूध संघाचे वैशिष्टय म्हणजे संघाला महाराष्ट्र शासन अगर राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाच्या दूध महापूर योजनेतून कोणतेही अनुदान प्राप्त झालेले नाही. तरी देखील संघ सभासदांच्या दूधाला इतर दूध संघाच्या दरांपेक्षा जादा दर देत आहे. शिवाय म्हैस खरेदी, सभासद विमा, सभासद प्रशिक्षण, अभ्यास दौरे इत्यांदीसाठी सध्या स्वतःच्या विकास निधीतून आर्थिक मदत करीत आहे. वारणा सहकारी संकूल देशात एक आदर्श ग्रामीण विकासाचे प्रारूप ठरले आहे.

## ३. मयुर दूध संघ

सहकारी क्षेत्रातील हा तिसरा दूध संघ म्हणावा लागेल, तथापि, कोल्हापूर जिल्हयात सर्वात प्रथम जन्माला आलेला शिरोळ सहकारी दूध संघ बंद झाल्याने या नव्या संघाची स्थापना झाली आहे.

कोल्हापूर व बेळगांव जिल्हयातील दूध उत्पादकांसाठी तंबाखू संघाचे संस्थापक एस. के. पाटील यांनी संघाची स्थापना १९९३ मध्ये केली. या संघाची स्थापना बहुराज्य सहकारी संस्था म्हणून झाली आहे. हा संघ देखील इतर दूध संघ जी कार्ये करतात ती कार्ये राबवत आहे. रोज ४० ते ४५ हजार लिटर दूधापेक्षा अधिक दूध संकलन केले जाते. शहरी भागात मयूर ब्रँड दूधाची लोकप्रियताही वाढत आहे. जिल्हयामध्ये तसेच इतर शहरात तसेच कर्नाटकामधील सीमाभागात अल्पावधीतच मयूर सहकारी दूध उत्पादक संघाने आपल्या कामाचा ठसा जनमानसात उमटविला असून प्रगतीची घोडदौड सुरू आहे.

## ४. श्री हनुमान दूध संस्था

वरील संघाशिवाय यळगुड येथे श्री हनुमान सहकारी डेअरीने या भागात आपले एक आगळे वेगळे स्थान प्राप्त केले आहे. दररोज अंदाजे २५ हजार लिटर दूधाचे संकलन, प्रक्रिया व पदार्थ तयार केले जात आहेत. संस्था गाव पातळीवर असूनही गेल्या ३०–३५ वर्षापासून सहकारी क्षेत्रात नावारूपाला आली आहे. कै.तात्यासाहेब मोहिते यांच्या शिकवणीने प्रशिक्षित झालेल्या ग्रामस्थांनी श्री वसंतराव मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली या संस्थेची स्थापना सन १९६७ मध्ये केली. दरसाल सुमारे १० कोटीची उलाढाल या संस्थेने करून व्यावसाईक व्यवस्थापनाचा उत्तम नमूना दिला आहे.

## कोल्हापूर जिल्हयातील अन्य खासगी दुग्ध व्यवसायातील संस्था

कोल्हापूर जिल्हयात दुग्ध व्यवसाय प्रामुख्याने सहकारी क्षेत्रात चालत असला तरी देखील खासगी व्यावसायीक अद्याप टिकून आहेत. अर्थात ते पूर्णपणे व्यवसायात मागे

हटणार नाहीत कारण दूर्गम ग्रामीण भागातील दूध संकलन, उत्पादकाला ॲडव्हान्स देणे, हलक्या दर्जाच्या दूधाची खरेदी इत्यादी कामे खासगी क्षेत्र करू शकते. त्यामुळे खासगी क्षेत्र करू शकते. त्यामुळे खासगी क्षेत्र चालूच राहणार कोल्हापूर जिल्हयात अमृत डेअरी, निकुंभ डेअरी, नेसरी दूध डेअरी प्रॉडक्ट, गोपाल, स्फूर्ती यासारख्या खासगी दूध डेअरीज काम करीत आहेत. गावातील सत्ता स्पर्धा यामुळे अशा संस्था अस्तित्वात आल्या आहेत.

## विभाग २ रा

## अभ्यासासाठी निवडलेल्या महिला सहकारी दूध संस्थांचा थोडक्यात परिचय :

**प्रस्तावना :**

प्रस्तुत अभ्यासासाठी १) श्री जयभवानी महिला सहकारी दूध संस्था मर्यादित शिनोळी खुर्द, ता. चंदगड,जि. कोल्हापूर २) श्री बाळकृष्ण महिला सहकारी दूध संस्था मर्यादित, मजरे कार्वे ता.चंदगड, जि.कोल्हापूर या दूध संस्थांची सहेतूक नमूना निवड पध्दतीने निवड केली आहे. या दोन दूध संस्थांमधील सभासद आणि संचालक सदस्यांचा अंतर्भाव प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या नमुन्यात आहे. म्हणून सदर दोन संस्थांचा थोडक्यात परिचय या विभागात दिला आहे.

### १) अभ्यास क्षेत्रासंबधी माहिती :

चंदगड तालुका हा कोल्हापूर जिल्हयाच्या दक्षिणेस ११५ कि.मी अंतरावर असून कर्नाटक, गोवा, व महाराष्ट्र यांच्या सरहददीवर सहयाद्रीच्या कुशीत आहे. तालुक्यात एकूण १५७ गावे आहेत व १०९ ग्रामपंचायती आहेत. तालुक्याचे भौगोलिक क्षेत्र एकूण ९५,२११ हेक्टर असून सन २००१ च्या जनगणनेनुसार तालुक्याची लोकसंख्या १,५८,४७१ इतकी आहे. तालुक्यात भात, नाचणा, ऊस, भुईमूग इत्यादी प्रमुख पिके घेतली जातात. काजूची लागवडही मोठया प्रमाणात केली जाते. तालुक्यात तिलारिनगर येथे जलविद्यूत

प्रकल्प असून इतरही लहानमोठे धरण प्रकल्प येथे राबविले आहेत. तालुक्याच्या पश्चीमेस बॉक्साईड खाणी आहेत, तालुक्यात ताम्रपर्णी, मार्कंडेय व घटप्रभा अशा तीन नद्या आहेत. तसेच दौलत सहकारी साखर कारखाना मौजे हलकर्णी येथे आहे

संशोधिकेने प्रस्तुत संशोधनासाठी चंदगड तालुक्यतील १) शिनोळी (खुर्द) २) मजरे कार्वे या दोन गावातील महिला दूध संस्थाची निवड सदरच्या अभ्यासासाठी केली आहे. त्या दोन गावांची सर्वसाधारण माहिती खालील प्रमाणे आहे.

## अ) शिनोळी (खुर्द) गावाचा परिचय :

शिनोळी खुर्द गांव चंदगड तालुक्याच्या पूर्वेस २७ कि. मी. अंतरावर व कोल्हापूर जिल्हयापासून १२५ कि मी. च्या अंतराच्या आसपास कर्नाटक महाराष्ट्र राज्याच्या सरहदद्‌वर वसलेले आहे. कर्नाटक मधील बेळगांव हे शहर बाजारपेठ म्हणून व इतर सोयीसाठी या गावाला खूपच जवळचे आहे. बेळगांव व शिनोळी खुर्द या दोन ठिकाणामधील अंतर १८ कि. मी. पेक्षाही कमी आहे.

सन २००१ च्या जनगणनेनूसार गावची एकूण लोकसंख्या १५४३ इतकी असून त्यामध्ये ७५८ महिला व ७८५ पुरूष व्यक्तिंचा समावेश आहे. गावाला स्वतःची ग्रामपंचायत असून तिची स्थापना दि १०.०६.१९६७ साली झाली आहे. ग्रामपंचायत मध्ये एकूण ९सदस्य आहेत.त्यामध्ये ३ महिला प्रतिनिधी आहेत. गावात एकूण २४९ घरे आहेत. त्यामध्ये १६९ घरे कच्ची बांधकामाची आहेत व ८० घरे सिमेंट कॉक्रीटमध्ये बांधलेली आहेत. गावात एकूण दारिद्रयरेषेखालील १६ कुटुंबे आहेत त्यामध्ये मागासवर्गीयापैकी ५ कुटुंबे आहेत. एकूण मागासवर्गीयांची लोकसंख्या १५० इतकी आहे.

गावामध्ये दोन शासकीय इमारती आहेत. त्यापैकी एक ग्राम पंचायत व दुसरी प्राथमिक आरोग्य केंद्र होय. गावात इतर एकूण सहकारी संस्थाची संख्या सहा आहे. गावामध्ये कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची एक शाखा कार्यरत आहे. या

बॅकेमध्ये स्थानीक , आजुबाजूच्या गावातील व कर्नाटकमधील बेळगांव सीमा भागातल्या काही गावातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे नेहमी आर्थिक देवघेवीचे व्यवहार सुरळीत चालू असतात. गावामध्ये २ युवक मंडळे व १ भजनी मंडळ सामाजिक, सांस्कृतिक दृष्टया कार्यरत आहे. गावात एकूण दोन शैक्षणिक संस्था आहेत. एक जिल्हा परिषद कोल्हापूरचे श्री राम विद्यामंदीर, प्राथमिक स्तरापर्यंतचे शिक्षण येथे दिले जाते. सन २००१ साली या शाळेची विद्यार्थी संख्या २७९ होती व माध्यमिक वसंत विद्यालय आहे त्या विद्यालयातील विद्यार्थ्यांची संख्या १४८ इतकी होती.

गावचा मुख्य व्यवसाय शेती हा असून प्रमुख पिक म्हणून भात,ऊस, नाचणा, भुईमूग इत्यादी पिकांचे उत्पादन केले जाते. गावच्या उत्तर पश्चिम भागात बेळगांव–वेंगुर्ला रोडवर शिनोळी बुद्रुक व देवरवाडी गावाच्या हददीत एम. आय.डी.सी. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत औद्योगिक कारखाने आहेत त्यामुळे शेती व्यवसायाबरोबच गावातील तरूणांना रोजगार मिळालेला आहे. गावामध्ये पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत्र म्हणून नदी विहिरीचा वापर केला जातो. शेतीसाठीही नदी व विहिरीच्या पाण्याचा वापर केला जातो. गावात एकूण २ सार्वजनिक विहिरी आहेत व २९ खाजगी मालकीच्या विहिरी आहेत. गावातील एकूण सार्वजनिक १० नळकोंडाळे असून ३० खासगी कनेक्शन्स दिलेली आहेत. त्यातून सकाळ व संध्याकाळी अर्धा पाऊण तास मुबलक पाणी पुरवठा केला जातो. गावात १ लाख ४० हजार लिटर क्षमतेची पाण्याची टाकी असून प्रती व्यक्ती ४० लिटर पाणी उपलब्ध होते.

गावात एकूण ६ ट्रक्टर धारक आहेत त्यामुळे शेतीच्या मशागतीसाठी बैलजोडी बरोबरच ट्रॅक्टरही वापरून मशागत व इतर शेतीची कामे जसे मालाची ने आण करण्यासाठी होतो. गावात एकूण १२ किराणा दुकाने आहेत छोटया गटातील पाच हॉटेल्स आहेत. २ हार्डवेअरची दुकानें आहेत. खाटीकसमाजाची पाच मटण दुकाने आहेत.

व इतर टेलरीग व्यवसाय व छोटी मोठी विक्री व दुरूस्तीची अशी मिळून १४ इतर दुकाने आहेत.

गावामध्ये स्वच्छतेला महत्व दिले गेले आहे त्यानुसार ७८ पेक्षा अधिक वैयक्तिक शौचालये बांधलेली आहेत. कचरा निर्मुलनासाठी शोषखडयांचा वापर केला जातो. पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी सुमारे ७०० मीटर लांबीची गटारे बांधली आहेत.

शिनोळी (खुर्द) गावात ५ प्राथमिक सहकारी दूध संस्था दूध संकलन करत आहेत. यावरून शेती व्यवसाया बरोबरच पशुपालन व दुग्ध व्यवसायाबदद्लचे चित्र आपल्या समोर येते. संशोधिकेने अभ्यासासाठी निवडलेल्या "श्री जयभवानी महिला सहकारी दूध संस्थेचे दैनंदिन दूध संकलन २०० लिटर पर्यंत असून गावातील इतरही दूध संस्था दूध संकलन करीत आहेत. त्यांचे दैनंदिन दूध संकलन अनुक्रमे खालील प्रमाणे आहे.

१) श्री दूधगंगा सहकारी दूध संस्था, मर्यादित शिनोळी (खुर्द) दैनंदिन दूध संकलन ५० लिटर २) श्री जयहनुमान महिला सहकारी दूध संस्था ४०० लिटर दैनंदिन दूध संकलन ३) श्री जयभवानी महिला सहकारी दूध संस्था २०० लिटर ४) श्री चव्हाटा दूध सहकारी संस्थेचे २५० लिटर संकलित केलेले दूध मयुर दूध संघाला पुरवठा केले जाते. ५) श्री दुर्गा दूध संस्थचे १०० लिटर संकलित दूध मयूर दूध संघाला पाठविले जाते. यावरून दिसून येते की शिनोळी खुर्द या गावात दैंनंदिन १००० लिटर दैनंदिन दूध संकलन होते.

प्रस्तुत अभ्यासासाठी सदर दूध संस्थची निवड करण्याचे कारण म्हणजे संशोधिका ही चंदगड तालुक्यात राहणारी असून तथ्य संकलनासाठी सोयीचे असल्या कारणाने सदर जयभवानी महिला सहकारी दूध संस्थेची निवड केली.

## ब) जयभवानी महिला सहकारी दूध संस्था मर्यादित शिनोळी खुर्द, ता.चंदगड, जि.कोल्हापूर या संस्थेचा परिचय :

संस्था स्थापन करण्यासाठी श्री गणपती यल्लूप्पा पाटील व त्यांचे सहकारी श्री पांडूरंग नारायण पाटील, श्री पुन्नाप्पा परशराम पाटील, श्री परशराम निंगाप्पा पाटील, श्री गुंडू जक्काप्पा मेणसे या व इतर सहकारी कार्यकर्त्यांनी मिळून सदर दूध संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेतला. सदरची दूध संस्था स्थापन करण्याचे राजकीय गटबाजी हे मुख्य कारण होते गावामध्ये अधीच नोंदणीकृत असणाऱ्या व दूध संकलन करणाऱ्या संस्था असल्यामुळे महिला सहकारी दूध संस्था नोंदणीकरणासाठी सहाय्यक निबंधकांकडे रितसर अर्ज करावा लागला व त्यातून प्रक्रिया होऊन श्री जयभवानी महिला सहकारी दूध संस्था दि २६.११.१९९६ ला नोंदणी करून घेऊन दिनांक ७ जून १९९६ पासून दूध संकलनाला सुरवात केली. त्यानंतर आधीच्या दोन स्थानीक दूध संस्थानी महिला दूध संस्थेविरूध्द सहाय्यक निबंध कोल्हापूर यांचे कडे तक्रार दाखल केली. त्या तक्रार काळात सदर संस्था दैनंदिन दूध संकलन सुरूच ठेऊन ते जवळच्या शिनोळी बुद्रुक येथील श्रीराम दूध संस्थेत जमा करत असत. त्यानंतर एक महिन्याने सदरच्या महिला दूध संस्थेला सहाय्यक निबंधकांकडून संकलन परवाना मिळाल्यानंतर प्रतिबाजूने विरूध्द मुंबई हायकोर्टात रिट दाखल केली त्याबददलची केस परत मंत्रालयात चर्चेला आल्यानंतर या तिन्ही संस्थाना नोटीसीद्वारे मंत्रालयात केससाठी एकत्रित उपस्थित राहण्यास सांगितले व त्यावर विचार विनिमय होऊन सदरच्या केसचा निकाल महिला दूध संस्थेच्या बाजूने लागला व रीतसर दूध संकलनाची परवानगी मुंबई, मंत्रालयाकडूनही मिळाली. त्यानुसार आज संस्था कार्यरत आहे.

श्री जयभवानी महिला सहकारी दूध संस्थेचे सुरवातीचे २५ लिटर पासूनचे दैनंदिन दूध संकलन हे आज २०० लिटर पर्यंत प्रती दिन पोहचले आहे. संस्थेत ७५ महिला सभासद आहेत. तर संस्था सभासदांच्या इच्छेनुसार व त्यांच्या उन्नतीसाठी कार्यरत आहे.

सुरवातीला दुसऱ्याच्या जागेत दूध संकलन करणा-या संस्थेने ५० हजार रूपये खर्चुन जागा खरेदी केली असून त्यावर २ लाख रूपये खर्च करून स्वतःच्या मालकीची वास्तु उभी केली आहे व दूध संकलनाचे काम करत आहेत.

संस्थेकडे आतापर्यंत निव्वळ नफा जवळ जवळ १ लाख रूपयाच्या आसपास आहे. यावरून संस्थेची आर्थिक स्थिती दिसून येते संस्था स्वतःच्या नफ्यातून प्रत्येक गरजू सभासदाला जनावरे खरेदी साठी पाचहजाररूपयांपर्यंत बिनव्याजी पैसे देत असते. त्याची परतफेड सभासदांच्या दूधबिलातून हप्त्याने वसूल केली जाते.

(श्री जयभवानी महिला सहकारी दूधसंस्था मर्यादित शिनोळी खुर्द, ता.चंदगड जिल्हा कोल्हापूर या संस्थेची प्रगती दाखविणारी आकडेवारी ( सन १९९५-१९९६ ते सन २००१ ते २००२ पर्यत ) पुढील पानावर दर्शविली आहे.

श्री जयभवानी महिला सहकारी दूधसंस्था मर्यादित शिनोळी खुर्द, ता.चंदगड जिल्हा कोल्हापूर या संस्थेंची प्रगती दाखविणारी आकडेवारी ( सन १९९५–१९९६ ते सन २००१ ते २००२ पर्यंत ) – वार्षिक अहवाल

| अ.क. | वर्षे | एकूण खरेदी | टक्केवारी | एकूण विक्री | टक्केवारी | व्यापारी नफा | टक्केवारी | निव्वळ नफा | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९९५-९६ | १९१८७८ | १००% | २१६२३३ | १००% | २४३५५ | १००% | ९३५२ | १००% |
| २ | १९९६-९७ | १४४८३१ | २.४५% | १६४९२१ | -२३.७३% | २००९० | -१७.५१% | १४५९० | ५६.०१% |
| ३ | १९९७-९८ | ४६२५०२ | २१९.३४% | ५२११६३ | ६८.३६% | ५८६६१ | १९१.९९% | ३७३४१ | १५५.९४% |
| ४ | १९९८-९९ | ६४४९५२ | ३९.४५% | ६९६५९८ | ३३.६६% | ५१६४६ | -११.९६% | २०१५९ | -४६.०१% |
| ५ | १९९९-२००० | ५९१०३४ | -८.३६% | ६३१९४६ | --१०.२३% | ७०८४७ | ३७.१८% | ४४५८१ | १२१.१५% |
| ६ | २०००-०१ | ६०३०६ | २.१८% | ६३९०५८ | १.१३% | ६२७२३ | -१२.९६% | ४८२६० | ८.२५% |
| ७ | २००१-०२ | ५९२२९९ | -१.९२% | ६५१६२६ | १.९७% | १००४५४ | ६०.१५% | १०१२५८ | १०९.८२% |

26.11.96

वरील सारणीवरून श्री जयमवानी महिला सहकारी दूध संस्थेची प्रगती होत असलेली दिसून येते. सुरवातीला दैनंदिन २५ ते ५० लिटर दूध संकलन करणारी संस्था आज दैनंदिन २०० लिटर दूध संकलन करत आहे. सन १९९५–१९९६ पासून संस्थेकडे असणारे भाग भांडवल हे कमी होते तरी सुध्दा सन २००१–२००२ पर्यंत संस्थेच्या निव्वळ नफ्यात वाढ झाली आहे हे दिसून येते. ९५–९६ साली केवळ ९३५२ रू नफा होता तर सन २००२–०३ साली संस्थेचा निव्वळ नफा १,०१,२५८ रू रू इतका झालेला आहे.

संस्थेला झालेल्या नफ्यातून संस्थेने सन १९९ साली ६५ महिला सभासदांच्या नांवे ३२५० रू विमा उतरविलेला आहे व त्याची मुदत सन ३१.०३.२००९ पर्यत आहे. संस्थेने स्वतःच्या नफ्यातून सन ९८–९९ साली सहा महिला सभासदांना २२ हजार रू बिन व्याजी कर्ज दिले. सन ९९–२०० साली ९८०५० रू २० सभासदाना दिले. सन २०००–२००१ साली ८०,१०० रू १६ सभासदांना दिले आणि २००१–०२ साली १४ सभासदांना कर्ज वाटप केले. संस्था दूभत्या जनावरांसाठी औषधोपचार व लस उपलब्ध करून देते. तसेच शैक्षणिक संस्थातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी शिक्षण निधीद्वारे आर्थिक मदत देते. सन ९६–९७ पासून प्रतीवर्षा १०० रू प्रमाणे शिक्षण निधी म्हणूनदिले आहेत. सर्स्थेची सभासद संख्या सन २००१–०२ पर्यत स्थिर म्हणजेच ७५ होती ती आता काही महिला सभासदांकडून संस्थेला दूध पुरवठा होत नसल्याकारणाने संस्थेने सन २००२–०३ मध्ये २९ सभासदांना कमी केले आहे सध्या संस्थेला ४६ सभासंदाकडून दूध पुरवले जाते.

## मजरे कार्वे : गावाचा परिचय

मजरे कार्वे हे गाव चंदगड तालुक्यात वसलेले असून कोल्हापूर जिल्हयापासून गावाचे अंतर जवळ जवळ ११५ कि.मी. आहे सन २००१ च्या जनगणनेनुसार गावाची एकूण लोकसंख्या ९३९ आहे. त्यामध्ये ४३७ पुरूष व ५०२ स्त्रीया आहेत संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता कार्यक्रमांच्या अंतर्गत ४५ वर्षाखालील स्त्री–पुरूष साक्षरता १०० टक्के झाल्याची ग्रामपंचायतीत नोंद आहे. गावाचे भौगोलिक क्षेत्र ३५२.५३ हेक्टर असून

लागवडीखालील खेत्र १६५.९९ हेक्टर आहे. त्यामध्ये नगदी पीक ऊस, भात इत्यादी ५५.७० हेक्टर क्षेत्रात घेतले जाते भुईमूग, रताळी व बटाटे सारखी पिके १३.६५ हेक्टर जमीनीत घेतली. जातात कुरणाखालील क्षेत्र ८८.२६ हेक्टर असून पडीक क्षेत्र १८.२८ हेक्टर आहे.

गावाचा मुख्य व्यवसाय शेती असून ऊस, भात, नाचणा भुईमूग, रताळी इत्यादी पिके घेतली जातात. काजूची लागवडही मोठया प्रमाणात केली जाते. नदी, विहिरी व बोअरवेल याद्वारे पाणी उपलब्ध होते. तसेच गावामध्ये पिण्याच्या व वापराच्या पाण्यासाठी विहिरी व नदीच्या पाण्याचा वापर केला जातो.

गावातील एकूण कुटूंबांची संख्या २४८ असून गावात एकूण १४८ कच्ची व १०० पक्की म्हणजेच सिमेंट कॉक्रीटमधील घरे आहेत. गावामध्ये दोन सरकारी इमारती आहेत एक ग्रामपंचायत व दुसरी प्राथमिक आरोग्य केंद्र, गावात पोष्ट ऑफीस असून दळणवळणाची सोय ही चांगली आहे. बेळगांव वेंगुर्ला रोडला लागून गाव वसलेले असल्यामुळे महाराष्ट्र व कर्नाटक डेपोच्या एस. टी. बसेस व खासगी प्रवासी वाहतूक करणारी वाहनांची सतत जा ये चालू असते. शिवाय बेळगांव शहर जवळ असल्याकारणाने मुख्य बाजारपेठ म्हणून खरेदी विक्रीसाठी बेळगांव शहरांशी संपर्क असतो.

गावातील शैक्षणिक संस्थांची संख्या चार आहे १) अंगणवाडी २)प्राथमिक मराठी विद्यामंदीर, मजरे कार्वे ३)महात्मा फुले माध्यमिक विद्यालय ४)महात्मा फुले उच्च माध्यमिक विद्यालय मजरे कार्वे अशा चार शिक्षण संस्थातून मूले व मूली शिक्षण घेत असतात.

आजरा अर्बन बॅकेची एक शाखा सदर गावात कार्यरत आहे. तसेच चंदगड तालुका शेतकरी सहकारी संघाच्या मालकीचा एक पेट्रोल पंप आहे तसेच गवात दोन दूध संस्था आहेत त्यापैकी एक श्री हनुमान सहकारी दूध संस्था व दुसरी संशोधिकेने अभ्यसासाठी निवडलेली श्री बाळकृष्ण महिला सहकारी दूध संस्था आहे. त्यापैकी श्री हनुमान दूध

संस्थेचे रोजचे संकलन २५० लिटरच्या आसपास आहे. तर श्री बाळकृष्ण महिला दूध संस्थेचे दूध संकलन दररोज ७० ते ८० लिटर पर्यत आहे. गावात इतरही सहकारी संस्था कार्यरत आहेत त्या म्हणजे हनुमान सहकारी पतसंस्था २) रवळनाथ सहकारी पत संस्था ३) विकास सेवा सोसायटी शिवाय गावात तीन तरूण मंडळे आहेत. शिवनेरी यूवक मंडळ, दक्षता यूवक मंडळ, फ्रेंडस सर्कल, इत्यादी गावात एक महिला मंडळ असून महिला मंडळ सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात सहभागी होऊन कार्यरत असते.

गावात दारिद्रय रेषेखालील एकूण ६२ कुटुंबे आहेत. त्यामध्ये मागासवर्गियांमधील १४ कुटुबांचा समावेश आहे. गावात पिण्याच्या पाण्याचे वाटप प्रतिव्यक्ती १२० लिटर आहे. पाणी पटटीचे दर खासगी कनेक्शनला ३६० रू सार्वजनिक ७५ रू आहे गावात सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी ५७० मीटर लांब गटार बांधकाम केले आहे व कचरा विल्हेवाट करण्यासाठी शोषखंडयाची सोय आहे.

गावात एकूण साध्या चूली २४८ पैकी निर्धूर १०८ गॅस सिलेंडर धारक ८६, गोबरगॅस प्लॅट ३६ व सौर उर्जा २ अशी स्वयंपाकसाठीची जळण व्यवस्था आहे.

विशेष महत्वाची बाब म्हणजे २००१ साली तालुका पातळीवर श्री संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत प्रथम कमांकाचा पुरस्कार मजरे कार्वे या सदर गावाने पटकाविला व तालुक्यामध्ये आदर्श गाव म्हणून नावारूपाला आले.

## ड) श्री बाळकृष्ण महिला सहकारी दूध संस्था मर्यादित मजरे कार्वे, ता. चंदगड जिल्हा, कोल्हापूर : थोडक्यात परिचय

मजरे कार्वे, ता चंदगड या गावी महिला सहकारी दूध संस्था स्थापन करण्यासाठी संस्थापक शंकर विठोबा बोकडे यांचे विशेष प्रयत्न कारणीभूत ठरले. सदरची महिला दूध संस्था स्थापन करण्यासाठी राजकीय गटबाजी हे एक प्रमुख कारण होते. तालुक्याच्या व स्थानिक पातळीवर एका गटाला मानणाऱ्या व्यक्ती दुस&या गटाला मानणाऱ्या व्यक्तीशी

व्यवस्थित व्यवहार करत नसल्याकारणाने गावात सुरूवातीला एक दूध डेअरी दूध संकलन करत असताना सुध्दा राजकीय गटबाजीतून दुसरी संस्था स्थापन करण्याचे ठरविले. याचाच परिणाम म्हणून श्री बाळकृष्ण महिला सहकारी दूध संस्था मर्यादित मजरे कार्वे, ता चंदगड जि. कोल्हापूर ही संस्था रजिस्टर नं केपी आर /सीजीडी /एजीआर(ओ) २०१९ डी ९९-२००० दिनांक २२.०७.१९९९ रोजी नोंदणी करण्यात आली. श्री शंकर विठोबा बोकडे, श्री अशोक गुडोपंत हारकारे, श्री यल्लुप्पा कुम्माना बोकडे, श्री रामू बापू बिर्जे, श्री रामचंद जोतिबा इंजल व त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी सदरची महिला दूध संस्था स्थापन करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. संस्थेची कागदोपत्री नोंद महिलांच्या नांवे असली तरी संस्था स्थापन करण्यापासून संस्थेचे कामकाज पुरूष व्यक्तीच पहात आहेत. असे संशोधिकेला प्रत्यक्ष निरिक्षणावरून दिसून आले असे चित्र अपवाद वगळता तालुका व जिल्हा पातळीवरील जवळ जवळ सर्वच महिला सहकारी व दूध संस्थातून दिसून येते. वर्ष किंवा सहा महिन्यातून होणाऱ्या जनरल मिटींगसाठी संचालिका व सभासद महिला संस्थेच्या सभेमध्ये हजर राहतात असे दिसून आले.

संस्थेची महिला सभासद संख्या ७१ आहे त्यापैकी संचालक मंडळात ९ महिला सदस्या आहेत सध्या संस्था दूध संकलनाचे काम श्री अशोक गुडोपंत हारकारे यांच्या मालकीच्या इमारतीमध्ये भाडे तत्वावर दूध संकलन करत आहे सदरच्या संस्थेत आज दैनंदिन सरासरी ७० ते ८० लिटर दूध संकलन केले जाते. संस्था स्वतःच्या नफ्यातून प्रत्येक गरजू सभासदाला बिनव्याजी तीन हजार रूपयापर्यंत दूभती जनावरे खरेदीसाठी सहाय्य देते ती रक्कम सदरच्या सभासदांकडून दूध बिलातून हप्त्याने आकारली जाते. त्यामुळे झालेले कर्जवाटपाची परतफेड व्यवस्थितपणे होत असते. शिवाय जिल्हा दूध संघाकडे संकलन केलेले दूध पाठविल्यानंतर त्याची योग्य ती किंमत दूधाच्या फॅटप्रमाणे त्या त्या सभासदाला दिली जाते. आज संस्था स्वतःच्या इमारतीसाठी जागा घेऊन इमारत बांधण्याचा विचार करत आहे. सध्या संस्थेकडे ५० हजार रूपयांच्या आसपास नफा

जमा आहे. सभासदांना बोनस व संस्थेच्या स्वतःच्या वास्तुसाठी ते पैसे संस्था वापरणार आहे.

( श्री बाळकृष्ण महिला सहकारी दूध व्यावसायिक संस्था मर्यादित मजरे कार्वे, ता चंदगड, जिल्हा कोल्हापूर या संस्थेची प्रगती दर्शविणारी आकडेवारी सन – १९९९–२००० आणि २००१–२००१ पर्यंत वार्षिक अहवाल. पुढील पानवार दर्शपिली आहे.)

सन 1999-2000,2001-02 श्री बाळकृष्ण महिला सहकारी दूध व्यावसायिक संस्था मर्यादित मजरे कार्वे, ता. चंदगड

| अ. क्र. | वर्षे | एकूण खरेदी | टक्केवारी | एकूण विक्री | टक्केवारी | व्यापारी नफा | टक्केवारी | निव्वळ नफा | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९९९-२००० | २९९६७५.९३ | १००% | २८२४२५.३६ | १००% | ३७०००.७१ | १००% | २३७३९.७१ | १००% |
| २ | २०००-०१ | ३३७७३०.७६ | १२.७०% | २५६२५४.३९ | -९.२६% | ५८६७४.११ | ५८.५७% | ३८१२२.०६ | ६०.५८% |
| ३ | २००१-०२ | ३४६७५०.३७ | ४२.६७% | २७७२६२.९४ | ८.२०% | ४८९९४.८६ | -१६.५०% | २५९४१.६७ | -३१.९५% |

वरील सारणीवरून श्री बाळकृष्ण महिला सहकारी दूध संस्थेची आर्थिक स्थिती दिसून येते.सदर संस्थेची सुरूवातीपासूनची सन १९९९-२००० पासून सभासद संख्या स्थिर आहे. संस्थेचे दैनंदिन दूध संकलन ७० ते ८० लिटर असून सन १९९९ -२००० साली २९९८८.३ लिटर वार्षिक दूध संकलन केले आहे.तर सन २००१-२००२ साली २६५५८.८ लिटर वार्षिक दूध संकलन केले आहे.तर सन २००१-२००२ साली २७,१७०.३ लिटर वार्षिक दूध संकलन झाले आहे. सन १९९९-२००० ते २००१-२००२ पर्यंत प्रतीवर्षी अनुक्रमे १००, १०५ व ११५ जनावरांना औषधोपचार व लस उपलब्ध करून दिली आहे. संस्थेने स्वतःच्या नफ्यातून आतापर्यंत १६ सभासदांना ३८००९० रू दूभती जनावरे खरेदीसाठी कर्ज पुरवठा केला आहे.

संस्थेला प्रारंभीच्या वर्षी ८७२२.७६ रू नफा झाला त्यानंतर २०००-०१ साली ३८१२२.०६ रू नफा झाला तर सन २००१-०२ साली २५९४१.०६ रू नफा झालेला आहे.

वरील सारणीवरून संस्थेची निव्वळ नफा व आर्थिक व्यवहाराची माहिती आपल्याला दिसून येते. यावरून असे म्हणता येते की, ग्रामीण भागात महिला सहकारी दूध संस्था महिलांच्या आर्थिक विकासात मोलाची मदत करत आहेत.

संदर्भ


१) पाटील व मुल्ला, १९९८ "कोल्हापूर जिल्हा कृषी विकास एक सिंहावलोकन", भारत: स्वातंत्र्य आणि विकास, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक लि., कोल्हापूर पान कमांक २२४ ते २२५

२) Rekha Pulekar 1993 "Impact of Dairy Co-operative on life of Rural Women", unpublished M. Phil., Dissertation, Shivaji Univeristy, Kohapur pp. 1.2

३) अरूण नरके १९९८ "दुग्धव्यवसायात गेल्या ५० वर्षात आपण काय मिळविले भारत स्वातंत्र्य आणि विकास कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक पानं क ३६४ ते ३६६.

४) आनंदराव पाटील चुयेकर १९९८ कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाने घडवलेली धवलक्रांती" भारत : स्वांतंत्र्य आणि विकास, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बॅंक पान क्रमांक ३७० ते ३७२

५) डॉ. पी. ए. कोळी (१९९८) "सहकारी दूग्ध व्यवसाय", कोल्हापूर जिल्हा आर्थिक प्रवाह, नाना गद्रे स्मृती गंथ पान कमांक १३२

६) डोंगळे २००३, गोकूळतर्फे महिला नेतृत्व विकास कार्यकम राबविणार" दैनिक पुढारी : पान कमांक ७.

७) डॉ. पी. ए. कोळी (१९९८) "सहकारी दुग्ध व्यवसाय" कोल्हापूर जिल्हा अर्थिक प्रवाह नाना गद्रे स्मृति ग्रंथ पान कमांक १३२.